# दैवी कणांविषयी अनुभूती

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ‘*’ या चिन्हाने दर्शवली आहेत. )


**१. दैवी कण मिळणे** १५

१ अ. सर्वसाधारण माहिती १५

१ आ. सात्त्विकता आणि दैवी कण २५

१ इ. रुग्णाईत असतांना दैवी कण मिळणे ३३

१ ई. दैवी कण जाणवणे आणि त्यानंतर प्रत्यक्ष दैवी कण मिळणे ३४

१ उ. दैवी कण पहाण्याची आणि मिळण्याची इच्छा देवाने पूर्ण करणे ३५

१ ऊ. भावजागृतीसाठी प्रयत्न केल्यावर दैवी कण मिळणे ३७

१ ए. देवाच्या कृपाशीर्वादरूपाने दैवी कण मिळणे ३९

१ ऐ. दैवी कण मिळणे आणि त्या माध्यमातून ईश्‍वर साधनेत साहाय्य करत असल्याचे जाणवणे ४०

१ ओ. ६० ते ६९ टक्के आध्यात्मिक पातळीच्या साधकांना आणि त्या साधकांमुळे इतरांना दैवी कण मिळणे ४२

१ औ. संत (७० टक्के आणि त्याहून अधिक आध्यात्मिक पातळी) आणि दैवी कण ४५

१ अं. दैवी कण मिळणे आणि प.पू. डॉ. आठवले ५३

१ क. दैवी कण मिळणे आणि श्रीकृष्ण ५५

**२. दैवी कण आणि ॐ** ५७

**३. दैवी कण मिळाल्याविषयी साधकांना प.पू. डॉ. आठवले आणि देव यांच्याप्रती कृतज्ञता वाटणे** ५८

* सामान्य जिवांनाही स्थूल डोळ्यांना दिसणारे दैवी कण दाखवल्याने प.पू. डॉक्टरांप्रती कृतज्ञता वाटणे ५८

* प.पू. डॉक्टरांच्या कृपेने दैवी कणांची उधळण होऊन देवाच्या

अस्तित्वाची अनुभूती आल्यामुळे साधिकेने प.पू. डॉक्टरांच्या
चरणी व्यक्त केलेली कृतज्ञता ! ५९
* देवाने चैतन्यमय कण पहायला दिल्यामुळे साधिकेला देवाप्रती
वाटत असलेली कृतज्ञता ! ६१
**४. दैवी कण मिळण्याविषयी घेतलेल्या पत्रकारपरिषदांच्या संदर्भात
आलेल्या अनुभूती ६३**
* पत्रकार परिषदेच्या निमित्ताने प.पू. डॉक्टरांचे तप, साधना आणि
कार्य वृत्तपत्रांतून सर्वांसमोर येईल, असा विचार मनात येणे ६३
**५. दैवी कणांना इतर माध्यमांतून प्रसिद्धी मिळणे ६९**
**६. 'एस्.एस्.आर्.एफ्.'च्या संकेतस्थळावरील (ssrf.org) 'गॉड
पार्टीकल ( दैवी कण )' या लेखाला मिळालेला प्रतिसाद आणि
लेख वाचून मिळालेला अभिप्राय ६९**

# मनोगत

अध्यात्म हा अनुभूतीचा विषय आहे. अध्यात्मात आधी अनुभूती येतात आणि मग त्या अनुभूती येण्यामागील शास्त्र कळते. सनातन संस्थेच्या साधकांना दैवी कण मिळणे, ही नाविन्यपूर्ण घटना होती. त्याविषयी काहीच माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे साधकांकडून दैवी कणांविषयी येणाऱ्या अनुभूतींची माहिती गोळा करणे महत्त्वाचे होते. त्या अनुभूतींतूनच दैवी कण केव्हा मिळतात, कोणाला मिळतात, का मिळतात, कोणत्या रंगाचे केव्हा मिळतात इत्यादी गोष्टींचा उलगडा होणार होता. साधकांनीही त्यांना गेले १ वर्ष मिळत असलेल्या दैवी कणांविषयीच्या अनुभूती बारकाव्यांसहित लिहून दिल्या. त्यांनी लिहून दिलेल्या अनुभूती या दैवी कणांविषयीच्या चौथ्या ग्रंथामध्ये संकलित केल्या आहेत. या आधीच्या दैवी कणांविषयीच्या तीन ग्रंथांमध्ये 'दैवी कणांची उत्पत्ती कशी होते, या उत्पत्तीची प्रक्रिया काय, कारणे काय, दैवी कणांच्या उत्पत्तीचे अध्वर्यू असलेले प.पू. डॉ. आठवले यांच्याकडून प्रक्षेपित होणाऱ्या दैवी कणांचे कार्य काय' इत्यादी ईश्वरी ज्ञानातून मिळालेली माहिती आहे. या माहितीला प्रस्तूत चौथ्या ग्रंथातील अनुभूती पूरक आहेत. या अनुभूतींमुळे दैवी कणांविषयीचे ज्ञान परिपूर्ण होईल, तसेच दैवी कणांविषयीच्या ज्ञानाच्या तात्त्विक भागाविषयी वाचकांना विश्वास वाटेल आणि त्यांच्या मनात श्रद्धाही निर्माण होऊ शकेल.

या ग्रंथामध्ये अनुभूतींची ३ प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात दैवी कण मिळण्याविषयीच्या अनुभूती आहेत. दैवी कण मिळण्याविषयी साधकांना मिळालेल्या पूर्वसूचनांतून 'दैवी कण मिळणे हे ईश्वरी नियोजनच कसे आहे', हे लक्षात येते. दैवी कणांविषयीच्या इतर अनुभूतींतून दैवी कण मिळण्यासाठी सात्त्विकता, भाव, श्रद्धा, तळमळ, आध्यात्मिक पातळी, समष्टी साधना इत्यादी निकष असतात, हे कळते. साधकांना ते रुग्णाईत असतांना, साधना करतांना थोडी निराशा आली असतांना मिळालेल्या दैवी कणांवरून 'साधना करणाऱ्याला ईश्वर साहाय्य कसे करतो', हे कळते. ग्रंथामध्ये विषयानुसार दिलेल्या अनुभूतींतून लक्षात येते की, प्रत्येक विषयाच्या संदर्भात अनेकांना अनुभूती आल्या आहेत. अनुभूतींच्या या वारंवारतेतून अध्यात्मशास्त्र (उदा. देवाप्रती उत्कट भाव ठेवला की, दैवी कण मिळतात, हे) सिद्ध होते.

दुसऱ्या प्रकरणामध्ये साधकांना सूक्ष्मातून दिसणाऱ्या दैवी कणांच्या संदर्भात आलेल्या अनुभूती दिल्या आहेत. काही साधकांना प्रत्यक्ष दैवी कण मिळण्याआधी सूक्ष्मातून दैवी कण दिसत होते. 'ईश्वरी तत्त्व योग्य वेळी प्रकट होऊन प्रत्यक्ष कार्य करू लागते', तसे साधकांची साधना वाढल्यावर दैवी कण प.पू. डॉ. आठवले यांच्या साधकांवरील कृपेमुळे प्रकट झाले आणि साधकांसाठी कार्य करू लागले. दैवी कण प्रत्यक्ष मिळू लागल्यानंतर अनेक साधकांना ते प्रार्थना, जप, सेवा, प्रवास करत असतांना सूक्ष्मातून दैवी कण दिसले. या अनुभूतींतून 'मी तुझ्या जवळच आहे', याची ईश्वराने

साधकांना ग्वाही दिली.

तिसऱ्या प्रकरणामध्ये दैवी कणांच्या परिणामांच्या अनुभूती दिल्या आहेत. दैवी कण मिळण्यामुळे साधकांची प्रासंगिक शारीरिक दुखणी दूर झाली. मनाची अस्वस्थता, न सुचणे असे त्रासही दूर झाले. आध्यात्मिक स्तराच्या परिणामांमध्ये 'दैवी कणांमुळे नामजप चालू होणे; सूक्ष्म-ज्ञानेंद्रियांना पंचमहाभूतांच्या संदर्भातील अनुभूती येणे; जीवात्म्याला शक्ती, चैतन्य, आनंद आणि शांती यांच्या अनुभूती येणे; वाईट शक्तींचा त्रास दूर होणे', अशा अनुभूती आल्या. त्यांतून दैवी कणांचे दैवी सामर्थ्य सिद्ध होते.

अशा प्रकारे या ग्रंथातून वाचकांना 'दैवी कणांच्या अनुभूती कशा आल्या, अनुभूती कशा प्रकारच्या येतात' इत्यादी गोष्टी कळतील. या ग्रंथामुळे वाचकांना साधनेविषयी जिज्ञासा निर्माण होऊन त्यांच्याकडून प्रत्यक्ष साधना घडू दे आणि त्यांच्या मनुष्यजन्माचे सार्थक होऊ दे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना.

या ग्रंथमालिकेचे सामायिक मनोगत या ग्रंथमालिकेतील 'खंड १ : दैवी कण' या ग्रंथात सविस्तरपणे दिले आहे.

– संकलक